आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२९ मे २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातला प्रचार उद्या संध्याकाळी थंडावणार / सर्वपक्षीय नेत्यांचा प्रचाराचा धडाका

- आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ७ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ राहण्याचा स्टेट बँक ऑफ इंडियाचा अंदाज

- रुद्रा एम टू या स्वदेशनिर्मित क्षेपणास्त्राची ओदिशातल्या हवाई दल तळावर यशस्वी चाचणी

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६६८ अंकांची घसरण

**आणि**

- नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या २४ तासात केरळात दाखल होण्यासाठी अनुकूल स्थिती / विदर्भात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यातला प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. उद्या संध्याकाळी प्रचार थंडावणार असल्यानं सर्वपक्षीय नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमधे मथुरापूर इथं प्रचारसभेला संबोधित केलं. आज जग भारताकडे आदरानं पाहतंय. देशातल्या नागरिकांनी केंद्रात भाजपाप्रणित रालोआ सरकार निवडून आणल्यामुळेच ही गोष्ट शक्य झाली

असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारनं केलेल्या कामांची उजळणी केली. भारताचं सुवर्णयुग घडवण्यात आगामी पाच वर्षे निर्णायक भूमिका बजावणार आहेत, त्यामुळे २०२४ची लोकसभा निवडणूक महत्वाची असल्याचंही ते म्हणाले. त्यांनी ओदिशात केंद्रपाडा आणि बालसोर इथंही प्रचारसभांना संबोधित केलं.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज झारखंडमध्ये दुमका इथं प्रचारसभा घेतली. इंडिया आघाडीचे सर्व नेते घोटाळ्यांमध्ये गुंतलेले आहेत, त्यांचे निम्मे नेते तुरुंगात, तर अर्धे जामिनावर बाहेर असल्याची टीका त्यांनी केली. विकासकामांना गती देण्यासाठी भाजपला मत देण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी बिहारमध्ये विक्रमगंज इथं प्रचारसभा घेतली. दहा वर्षांनंतर काँग्रेस भारतातून नामशेष होईल, तर राष्ट्रीय जनता दलही विस्मृतीत जाईल अशी टीका त्यांनी केली. रालोआ सरकारनं दुसऱ्या कार्यकाळात केलेल्या लोककल्याणकारी कामांचा तिसऱ्या कार्यकाळात व्यापक विस्तार केला जाईल असं ते म्हणाले.

उत्तर प्रदेशात केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी महाराजगंज, देवरिया, बलिया आणि सोनभद्र इथं प्रचारसभा घेतल्या, तर गाझीपूरमध्ये त्यांनी रोड शो केला. या निवडणूकीत भाजपा ३०० पेक्षा जास्त जागा जिंकेल असा दावा त्यांनी महाराजगंज इथल्या सभेत केला.

उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कुशीनगरमध्ये प्रचारसभेला संबोधित केलं. देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी केवळ भाजपाच सक्षम असल्याचं ते म्हणाले. त्यांनी देवरिया आणि गोरखपूर जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या.

इंडिया आघाडी आणि इतर विरोधी पक्षांनीही प्रचाराचा धडाका लावला आहे.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पंजाबमध्ये लुधियाना इथं प्रचारसभा घेतली. इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर शेतमालाला किमान आधारभूत किंमत दिली जाईल, शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं जाईल या आश्वासनांचा त्यांनी पुनरुच्चार केला. देशाच्या संविधानाचं रक्षण करण्यासाठी आपण ही निवडणूक लढवत आहोत असं ते म्हणाले. पंजाबमधल्या अंमली पदार्थांच्या वाढत्या व्यसनाबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी ओदिशात बालसोर इथं प्रचारसभेला संबोधित केलं. येत्या ४ जूनला मोदी सत्तेतून पायउतार होतील, असं ते म्हणाले.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी दुधी इथं काँग्रेसच्या उमेदवाराचा प्रचार केला, त्यानंतर त्यांनी रॉबर्टगंज आणि मिर्झापूर मध्ये इंडिया आघाडीच्या सभांना संबोधित केले. त्यांच्या पत्नी डिंपल यादव यांनी कुशीनगर इथं रोड शो केला. भाजपाकडे महागाई आणि त्यांनी शेतकऱ्यांसोबत केलेल्या विश्वासघाताचं उत्तर नाही, त्यामुळे या निवडणुकीत जनता त्यांना १४० जागाही देणार नाही असं ते मिर्झापूर इथल्या प्रचारसभेत म्हणाले.

बिहारमध्ये पाटलिपुत्र इथं राजदचे अध्यक्ष लालूप्रसाद यादव हे देखील प्रचारासाठी मैदानात उतरले. राजद नेते तेजस्वी प्रसाद यादव यांनी सासाराम, काराकाट-बक्सर आणि पाटलिपुत्र इथं प्रचारसभा घेतल्या. या निवडणूक प्रचारात सत्ताधारी भाजपा गेल्या १० वर्षांमधल्या आपल्या कामगिरीबद्दल काहीच बोलत नाही, त्याऊलट ते केवळ हिंदू - मुस्लिम वाद घडवून आणणारे मुद्दे मांडत आहेत अशी टीका त्यांनी पाटण्यात बातमीदारांशी बोलताना केली.

आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी पंजाबमध्ये मंडी गोविंदगढ इथे रोड शो केला. जालंधरमध्ये त्यांनी व्यापाऱ्यांसोबत टाउनहॉल सभा घेतली.

**<><><><><>**

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत मतदानाचं प्रमाण वाढावं यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन केंद्रीय निवडणूक आयोगानं केलं होतं, ते राज्यात साध्य झाल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं सांगितलं आहे. राज्यात सार्वत्रिक लोकसभा निवडणूक, २०२४ ही पाच टप्प्यात घेण्यात आली. त्यामध्ये एकूण ६१ पूर्णांक ३३ शतांश इतके टक्के मतदान झालं. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ही ३ कोटी ६ लाख ५६ हजार ६११ इतकी आहे. तर महिला मतदारांची संख्या २ कोटी ६३ लाख ४८ हजार ७१७ इतकी आहे. तर इतर मतदार यामध्ये १ हजार ४५० जणांनी मतदानाचा हक्क बजावला.

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत भारताचा जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ७ पूर्णांक ४ दशांश टक्के, तर २०२४ मधे जीडीपीत ८ टक्के वाढ होईल, असा अंदाज स्टेट बँक ऑफ इंडियानं व्यक्त केला आहे. देशाच्या ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात सातत्यानं आर्थिक वाढ होत असल्याचं स्टेट बँकेच्या ताज्या अहवालात म्हटलं आहे. प्रवासी वाहन विक्री, जीएसटी संकलन, क्रेडिट कार्डचा वापर, टोल संकलन यांचा शहरी भागातल्या आर्थिक वाढीत वाटा आहे. तर ग्रामीण भागात दुचाकी विक्री आणि पेट्रोलियम पदार्थांच्या वापराचा वाटा जास्त असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

रुद्रा एम टू या स्वदेशनिर्मित क्षेपणास्त्राची चाचणी आज ओदिशातल्या हवाई दल तळावर यशस्वी झाली. डी आर डीओ म्हणजेच संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं ही चाचणी घेतल्याचं संरक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. आकाशातून जमिनीवर मारा करणाऱ्या या क्षेपणास्त्राचा मारा हवाई दलाच्या Su-30 MK-I तळावरुन करण्यात आला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी या चाचणीबद्दल डीआरडीओ आणि हवाई दलाचं अभिनंदन केलं आहे. डीआरडीओ चे अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनीही संघटनेच्या पूर्ण चमूचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

जागतिक शेअर बाजारातल्या नकारात्मक परिस्थितीमुळे सेन्सेक्स आणि निफ्टी आज सलग चौथ्या दिवशी घसरले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ६६८ अंकांनी घसरून ७४ हजार ५०३ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १८३ अकांच्या घसरणीनंतर २२ हजार ७०५ वर बंद झाला. एकंदर सात क्षेत्रांमध्ये वाढ, तर १३ क्षेत्रांमध्ये घट पाहायला मिळाली.

**<><><><><>**

पालघर रेल्वे स्थानकात काल संध्याकाळी मालगाडीचा अपघात झाल्यानंतर आज संध्याकाळी जवळपास २६ तासांनंतर विरारहून पहिली लोकल डहाणूकडे रवाना झाली. या अपघातामुळे पश्चिम रेल्वेची विरार ते डहाणूदरम्यानची सेवा काल संध्याकाळपासून पूर्णपणे बंद होती. रेल्वेमार्ग दुरुस्तीचं काम अजूनही सुरु आहे.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या २४ तासात केरळात दाखल होण्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली असल्याचं भारतीय हवामानशास्त्रविभागाने म्हटलं आहे. दरम्यान आज राज्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली. सर्वात जास्त कमाल तापमान ब्रह्मपुरी इथं ४५ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची, तर विदर्भात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामानशास्त्र विभागाच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमधल्या प्रवेशासाठी बँकॉकमध्ये सुरु असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध पात्रता स्पर्धेत भारताच्या अरुंधती चौधरी हीनं महिलांच्या ६६ किलो वजनी गटात  उप - उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. आज झालेल्या लढतीत अरुंधती हिनं पोर्टो रिकोच्या स्टेफनी हिच्यावर ५-० अशी मात केली. पुरुषांच्या  ९२ किलो वजनी गटात मात्र भारताच्या नरेंदर बेरवाल याला कडव्या इक्वेडोरच्या गेरलॉन गिलमर याच्याकडून पराभव स्विकारावा लागल्यानं, त्याचं आव्हान संपुष्टात आलं.

<><><><><>

भारत, वर्ष २ हजार २४ ते २ हजार २६ या कालावधीसाठी कोलोम्बो प्रक्रियेचं अध्यक्षस्थान भूषवणार आहे. कोलोम्बो प्रक्रिया सुरु झाल्यापासून पहिल्यांदाच भारताला हा मान मिळत आहे. दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातून कामगारांना सुरक्षितरित्या,विधिवत दुसऱ्या देशात नेण्यासाठीची प्रक्रिया म्हणचे कोलोम्बो प्रक्रिया होय.

**<><><><><>**

कडाक्याच्या उन्हाळ्यानंतर रेमाल चक्रीवादळामुळे मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे संपूर्ण ईशान्य भारतातलं जनजीवन विस्कळीत झालं आहे. या चक्रीवादळामुळे गेल्या २४ तासांमध्ये ईशान्येतल्या राज्यांमध्ये किमान ३३ जणांचा मृत्यू झाला आहे. हवामान विभागानं या भागातल्या राज्यांना रेड अलर्ट दिला आहे.

रेमाल चक्रीवादळामुळे पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाणी तुंबलं आहे. समुद्राचं पाणी शेती आणि मासेमारीच्या जागेत घुसलं आहे आणि नद्या किनारे ओलांडून वाहात आहेत. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातल्या हिंगलगंज इथं उभ्या पिकांचं काही प्रमाणात नुकसान झालं आहे.

**//<><><><><>//**